# जाहिरात

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीनुसार महिला व बाल कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांना या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, बालकांच्या काळजी व संरक्षणाकरीता चालविण्यात येणाऱ्या निरीक्षणगृहे, विशेषगृह, सुरक्षित जागा (Place of safety), बालगृहे, खुले निवारागृह, विशेष दत्तक संस्था या सारख्या संस्था कार्यरत करु इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

१. त्याअनुषंगाने राज्यातुन स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले होते.परंतु प्रस्तावाच्या छाननीमध्ये **सिंधुदूर्ग, धुळे,नंदूरबार,अकोला,वाशिम,भंडारा,गोंदीया, औरंगाबाद, हिंगोली व परभणी** या जिल्हयातील संस्थांनी सादर केलेले प्रस्ताव निकषानुसार परिपूर्ण नसल्याने सदर जिल्हयाकरीता नोंदणी प्रमाणपत्राचे प्रस्ताव या जाहिरातीद्वारे पुनःश्च मागविण्यात येत आहे. सदर जिल्हयातील इच्छुक संस्थांनी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ४१ नुसार नोंदणी प्रमाणपत्राचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना २७ (नियम २२ (२) आणि २३(२) ) नुसार विहित नमुन्यामध्ये अर्ज ऑनलाईन **पध्दतीने https:womenchild.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर बातम्या आणि सुचना विभागाअंतर्गत** उपलब्ध करुन दिलेल्या लिंक वर दिनांक - ३०.११.२०१८ पर्यत सादर करावेत. तसेच सदर जिल्हयातील स्वयंसेवी संस्थांनी यापूर्वी अर्ज सादर केलेले आहेत परंतु सदरचे अर्ज परिपूर्ण नाहीत अशा संस्थांनी सुध्दा निकषानुसार नोंदणी प्रमाणपत्राचे प्रस्ताव सादर करु शकतील. सदर कालावधीनंतर नोंदणी प्रमाणपत्राचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाही. नोंदणी प्रमाणपत्राशिवाय संस्था कार्यरत राहील्यास अशा संस्थांवर कायदयाच्या कलम ४२ अंतर्गत फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

२. तसेच या जाहिरातीद्वारे विशेष दत्तक संस्था चालवू इंच्छिणाऱ्या संस्थांना कळविण्यात येते की, **सिंधुदूर्ग, पालघर,जळगांव,नंदुरबार, गडचिरोली,गोंदीया, हिंगोली, बीड, यवतमाळ, वाशिम, उस्मानाबाद, परभणी** या जिल्हयाकरीता विशेष दत्तक संस्था चालवू इच्छिणाऱ्या संस्थांनी विशेष दत्तक संस्थांकरीता नोंदणी प्रमाणपत्राचे ऑनलाईन प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना २७ (नियम २२ (२) आणि २३(२) ) नुसार विहित नमुन्यामध्ये अर्ज दिनांक - ३०.११.२०१८ पर्यत सादर करावेत.

संस्थांनी त्यांचे अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर त्या अर्जाची प्रिन्ट काढून व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची सांक्षाकीत छायांकीत प्रत बंद लखोटयात आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग, जुन्या सर्कीट हाऊस जवळ, पुणे ४११००१ या पत्यावर दिनांक - ०३.१२.२०१८ पर्यत सादर करावेत. नोंदणी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी संस्थांनी निती आयोगाच्या Darpan Portal वर नोंदणी करणे आवश्यक आहे. निती आयोगाच्या Darpan Portal नोंदणी नसल्यास केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.